कुपटा(सं.) लघु पाटबंधारे योजना
ता. मानोरा जि. वाशिम
योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय
मान्यता प्रदान करणेबाबत.

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक:-...928.../ विपाविम/कातां ७(१)/कुपटा (सं.)/ प्रथम सुप्रमा /(धा.क्र ०१/२०२२)/ २०२३, दि.18/07/2023**

**संदर्भ:** १. मुळ प्रशासकीय मान्यतेचा विपाविम,नागपुर चा निर्णय क्र. विपाविम/कातां ६ / २९२५ /कुपटा/ प्रमा /(५२/२००८ )/ २००८, दि. ३०.०६.२००८

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५

३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे पत्र. क्र. रातांसस-१/कक्ष-१/(अंवप्रकिं)/कुपटा(सं.)लपा/(धा.क्र.११/२०२२)/९१/२०२३,दि.२४.०१.२०२३

४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.०२.०६.२०२३ रोजी संपन्न झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०२३/(३७/२०२३)/लपा, दि. १३.०६.२०२३

५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १९.०६.२०२३ रोजी संपन्न ८३ व्या बैठकीतील मंजुर ठराव क्र. ८३/३७

**प्रस्तावना:**

कुपटा (सं.) लघु पाटबंधारे योजना, हा प्रकल्प या महामंडळांतर्गत वाशिम जिल्ह्यातील गोदावरी खो-यातील पैंनगंगा उपखो-यात मानोरा तालुक्यातील कुपटा गावाजवळून वाहणा-या स्थानिक नाल्यावर बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्पामुळे वाशिम जिल्ह्यातील, मानोरा तालुक्यातील कुपटा गावातील ५२८ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

कुपटा (सं.) लघु पाटबंधारे योजना, ता. मानोरा, जि. वाशिम या योजनेस विपाविम निर्णय क्र. विपाविम/ कातां- ६/२९२५/ कुपटा/प्रमा/(५२/२००८)/२००८, दि. ३०.०६.२००८ अन्वये रू. १०.०३ कोटी (रू.दहा कोटी, तीन लक्ष फक्त) इतक्या किंमतीस (दरसुची २००७-०८ वर आधारीत) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदल, भुसंपादन किंमतीतील वाढ, संकल्प चित्रातील बदल इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावात किंमत मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक असल्याने प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे .

कुपटा (सं.) लघु पाटबंधारे योजनेचा प्रथम सुप्रमा बाबतचा मुल्यार्पण अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. ०१.११.२०२२ रोजीच्या १७७ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र.३ नुसार प्राप्त झालेला आहे.

कुपटा (सं.) लघु पाटबंधारे योजनेच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि. ०२.०६.२०२३ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १९.०६.२०२३ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र.८३/३७ नुसार कुपटा (सं.) लघु पाटबंधारे योजनेच्या रू. १३.८० कोटी अंदाजित किंमतीच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय

मान्यता प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या मुल्यार्पण अहवालातील मुद्दा क्र.६ ची पुर्तता करण्याच्या अधीन राहून मान्यता दिली असून प्रकल्पाच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेबाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाची मुळ प्रशासकीय मान्यता किंमत रू. १०.०३ कोटी च्या तुलनेत प्रथम सुप्रमा प्रस्तावानुसार प्रकल्पाची किंमत रू. ३.७७ कोटीने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू कोटी | मंजूर मुळ प्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी | एकूण वाढीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | दरसुचीतील बदलामुळे | २.६६ | २६.५३ | ७०.५७ |
| २ | जास्त दराची निविदा स्विकृतीमुळे | ०.२७ | २.६९ | ७.१५ |
| ३ | भुसंपादन किंमतीतील वाढ | ३.१९ | ३१.८ | ८४.६० |
| ४ | संकल्प चित्रातील बदलामुळे झालेली वाढ | ०.६४ | ६.३८ | १६.९८ |
| ५ | ईतर कारणांमुळे झालेली वाढ | -१.५० | (-)१४.९५ | (-)३९.७७ |
| ६ | अनुषंगिक खर्चात झालेली वाढ | -१.४९ | (-)१४.८५ | (-)३९.५३ |
| | **एकूण** | ३.७७ | ३७.६० | १०० |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय-**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये वाशिम जिल्ह्यातील कुपटा (सं.) लघु पाटबंधारे योजना, ता. मानोरा, जि. वाशिम या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रू. १३.८० कोटी (रू. तेरा कोटी, ऐंशी लक्ष फक्त) किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. १३.७९ कोटी (रू. तेरा कोटी एकोणैंशी लक्ष फक्त) कामा प्रित्यर्थ व रू. ०.०१ कोटी (रू. एक लक्ष फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाच्या सन २०२०-२१ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. प्रकल्पाच्या उपशिर्षनिहाय किंमतीचा गोषवारा सोबतच्या परिशिष्टामध्ये संलग्न आहे.

**१.ठळकबाबी:-**

| | | |
|---|---|---|
| अ) | योजनेचे सिंचन क्षेत्र | ५२८ हेक्टर |
| ब) | योजनेचा एकुण पाणीसाठा | ३.६३ दलघमी |
| क) | योजनेची प्रति स.घ.मी. पाणी साठा किंमत | रु.३७९५५/- (मापदंड रू.१२२१३२ X ९०% =१०९९१९/- प्रती स.घ.मी.) |
| ड) | योजनेचे लाभव्यय गुणोत्तर | १.२७ (मापदंड १.० पेक्षा जास्त) |
| इ) | आर्थिक परतावा दर | १२.१४ % (मापदंड १२ पेक्षा जास्त) |

२.या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२", लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (शासन अंशदान)( लघु प्रकल्प), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (योजना